आत्मदीपो भव!

रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनी

Rambhau Mhalgi Prabodhini

# महिलांचे क्षमता संवर्धन

आत्मदीपो भव !

# रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनी
Rambhau Mhalgi Prabodhini

## व्यवस्थापन समिती

| | |
|---|---|
| देवेंद्र फडणवीस | अध्यक्ष |
| डॉ. विनय सहस्रबुद्धे | उपाध्यक्ष |
| विजय (भाई) गिरकर | सचिव |
| अरविंद रेगे | कोषाध्यक्ष |
| प्रा. अनिरुद्ध देशपांडे | सदस्य |
| वी. सतीश | सदस्य |
| रेखा महाजन | सदस्या |
| रामस्वामी बालासुब्रमण्यम | सदस्य |
| श्रीकांत बडवे | सदस्य |
| सुधीर मेहता | सदस्य |
| प्रदीप पाण्डेय | सदस्य |

| | |
|---|---|
| डॉ. जयंत कुलकर्णी | कार्यकारी संचालक |

Society Registration Act (Registration No. 618 Bom. /82)
Trust Act (Registration No. F-7863 Bom. /82)
80G - Certificate No. AAATR3174JF20072 Valid upto AY 2026-2027
12A - Certificate No. AAATR3174JE19829 Valid upto AY 2026-2027
• FCRA No. 083780667 • PAN No.: AAATR3174J
• TAN No.: MUMR16886C • GST No.: 27AAATR3174J1ZA


# महिलांचे क्षमता संवर्धन

## पार्श्वभूमी




राजकीय आणि सामाजिक क्षेत्रातील विविध घटकांसाठी प्रशिक्षणाच्या माध्यमातून क्षमता संवर्धन आणि नेतृत्व विकास साधणारी स्वयंसेवी संस्था म्हणून रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनी सुपरिचित आहे. प्रबोधन, प्रशिक्षण आणि संशोधन या त्रिसूत्रीनुसार कार्यरत असणा-या प्रबोधिनीस संपूर्ण दक्षिण-पूर्व आशियासाठी संयुक्त राष्ट्रसंघाने 'विशेष सल्लागार संस्था' हा दर्जाही बहाल केला आहे. सुशासन, शिक्षण, व्यक्तिमत्त्व विकास, संस्था बांधणी, महिला सक्षमीकरण इत्यादी अनेक महत्त्वाच्या विषयांवर प्रबोधिनीतर्फे सातत्याने उपक्रम आयोजित केले जातात.

समाजाच्या विविध क्षेत्रांत महिला अत्यंत भरीव असे योगदान देत आहेत. राजकारण, पत्रकारिता, संशोधन, कृषी-उत्पादन, संरक्षण आणि उद्योग यांसारख्या तुलनेने आव्हानात्मक असलेल्या क्षेत्रांमध्येही महिला लक्षणीय कामगिरी करीत आहेत. संसदीय लोकशाही व्यवस्थेमध्ये लोकांमधून निवडून येणाऱ्या प्रतिनिधींच्या हातात कायदे करण्याचे आणि त्याच्या आमल्बाजाव्नीचे पूर्ण अधिकार असतात. एका अर्थाने प्रचलित व्यवस्थेमधील हे सर्वमान्य आणि सर्वोच्च अधिकारांचे व्यासपीठ आहे. समाजाचा निम्मा हिस्सा असणाऱ्या महिलांचा राजकारणातील सहभाग मात्र तुलनेने बराच कमी आहे.




२०४७ सालापर्यंत विकसित भारत उभा करण्याचा संकल्प महिलांच्या व्यापक आणि निर्णायक सहभागाशिवाय पूर्ण होणे अशक्य आहे. पारंपारिक समज आणि अपेक्षा यांचे ओझे हा आजही महिला सक्षमीकरणाच्या मार्गातील मोठा अडसर आहे. भारतातील महिलांनी कायदेशीर हक्कांच्या बाबतीत खूप लांब पल्ला गाठला आहे, तरीही पूर्ण लैंगिक समानता आणि भेदभाव आणि हिंसाचारापासून संरक्षण सुनिश्चित करण्यासाठी बरेच काम करणे बाकी आहे. कागदावर उपलब्ध असलेल्या शिक्षण आणि नोकरी-व्यवसायाच्या समान संधी प्रत्यक्षात येण्यासाठी विशिष्ट क्षेत्रांमधील विशेष प्रशिक्षण महिलांना उपयुक्त ठरू शकते. ही गरज लक्षात घेऊन प्रबोधिनीने काही प्रशिक्षण कार्यक्रम निश्चित केले आहेत.

## पूर्वेतिहास

राष्ट्रीय महिला आयोग (NCW) आणि रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनी यांच्या संयुक्त विद्यमाने मागील दोन वर्षांत महिला सक्षमीकरणाचे १५ विशेष प्रशिक्षण कार्यक्रम प्रबोधिनीच्या उत्तन येथील निवासी संकुलात आयोजित करण्यात आले होते. राजकीय क्षेत्रातील महिला नेतृत्व अधिक सक्षम आणि प्रभावी बनावे हा या आयोजनामागील हेतू होता. महाराष्ट्रातील सर्व जिल्ह्यांतून ग्रामपंचायत,जिल्हा परिषद, नगर पालिका आणि महानगर पालिका या पंचायत राज्य-प्रणालीच्या सर्व स्तरांवरील सुमारे ६०० महिला लोकप्रतिनिधी या प्रशिक्षण कार्यक्रमांमध्ये सहभागी झाल्या होत्या.



पंचायत से पार्लमेंट या कार्यक्रमांतर्गत राष्ट्रीय महिला आयोगाच्या आमंत्रणावरून महाराष्ट्रातील ५० महिला लोकप्रतिनिधी प्रबोधिनीतर्फे दिल्ली येथे उपस्थित होत्या. दि. ५ जानेवारी २०२४ रोजी जुन्या संसद भवनात झालेल्या या कार्यक्रमाला लोकसभेचे तत्कालीन सभापती श्री. ओमप्रकाश बिर्ला यांच्यासह अनेक मान्यवरांनी मार्गदर्शन केले.

कृषी आणि कृषी सबंधित कामांमध्ये महिलांचा वाटा खूप मोठा आहे. परंतू त्या प्रमाणात त्यांच्या समस्यांची दखल घेतली जात नाही. त्यांचे शारीरिक श्रम कमी होतील आणि कामाची गुणवत्ताही वाढेल असे अनेक उपाय आज उपलब्ध असूनही त्यांच्यापर्यंत पोहचू शकत नाहीत. नेमक्या याच मर्यादांवर बोट ठेऊन प्रबोधिनीने महिला शेतकरी आणि शेती-कामगारांसाठी एक विशेष कार्यशाळा दि. १४ फेब्रुवारी २०२४ रोजी आयोजित केली होती. शेती-पूरक व्यवसाय, कर्ज उपलब्धता, नवे तंत्रज्ञान, शेती उत्पादन विक्री अशा अनेक विषयांवर या कार्यशाळेत सोदाहरण मार्गदर्शन करण्यात आले.

## प्रशिक्षण कोणासाठी ?

- राजकीय क्षेत्रात कार्य करू इच्छिणाऱ्या महिला
- राजकीय पक्षांच्या महिला पदाधिकारी
- महिला लोकप्रतिनिधी
- महिला शेतकरी, शेती कामगार त्यांचे बचत गट व अन्य संस्था
- शेती उत्पादन-विक्री संस्थांमधील (FPOs) महिला
- महिला उद्योजिका
- सैन्यदलांत जाऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थिनी
- संशोधन क्षेत्रात जाऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थिनी
- महिला पत्रकार
- आपापल्या कार्यक्षमता भौगोलिय (Geo-Spatial) तंत्रज्ञानाचा उपयोग करू इच्छिणाऱ्या सामाजिक, शासकीय आणि राजनैतिक क्षेत्रातील महिला







# विषयांनुरूप प्रशिक्षणाचा आशय

## राजकारण

### १. राजकीय क्षेत्रात कार्य करू इच्छिणाऱ्या महिला

- भारतीय संविधानाची तोंडओळख
- लोकशाही आणि राजकारण
- महिलांचे राजकारणातील योगदान
- महिला विषयक कायदे
- महिला सशक्तीकरण : विविध शासकीय योजना
- मतदार संघ बांधणी
- जनसंपर्क आणि सोशल मिडियाचा परिणामकारक वापर
- व्यक्तीमत्व विकास
- मुल्ये आणि नैतिकता
- नेतृत्व कौशल्य
- संवाद आणि संभाषण कला
- मानसिक ताण-तणावाचे व्यवस्थापन
- वेळेचे व्यवस्थापन
- उपक्रमशीलता: अभ्यास, नाविन्य आणि सातत्य

### २. राजकीय पक्षांच्या महिला पदाधिकारी

- भारतीय संविधानाची तोंडओळख
- महिलांचे राजकारणातील योगदान
- महिला विषयक कायदे
- महिला सशक्तीकरण : विविध शासकीय योजना
- माझे पद - माझी जबाबदारी
- पदभारीत कार्याचा वार्षिक अहवाल
- जनसंपर्क आणि सोशल मिडियाचा परिणामकारक वापर
- राजकीय भाषण कला
- मानसिक ताण-तणावाचे व्यवस्थापन
- कार्यालयीन कामकाजाचे व्यवस्थापन
- भविष्यातील वाटचाल आणि आव्हानात्मक कामातील सातत्य

### ३. महिला लोकप्रतिनिधी

- कायदे निर्मितीत महिलांचे योगदान
- नारी शक्ती वंदन विधेयक : आव्हाने आणि संधी
- मतदार संघ - जनतेच्या अपेक्षा, कामाचे नियोजन आणि वार्षिक कार्य अहवाल
- निर्णय प्रक्रियेतील प्रत्यक्ष सहभाग: अडचणी आणि उपाय
- महिला समस्या : बदलते सामाजिक संदर्भ
- सभागृहातील कामकाजात परिणामकारक सहभाग
- कार्यकर्ता संघ बांधणी
- जनसंपर्क आणि सोशल मिडियाचा प्रभावी वापर
- मानसिक ताण-तणावाचे व्यवस्थापन
- ग्राम पंचायत /नगर पालिका / महा-नगर पालिका / विधानसभा: नियम, कायदे आणि आर्थिक तरतुदी

## कृषी

### ४. महिला शेतकरी, शेती कामगार त्यांचे बचत गट व अन्य संस्था

- भारतीय महिलांचा कृषी क्षेत्रातील कामाचा वाटा
- शेतीविषयक शासकीय सवलती व सुविधा आणि विविध योजना
- आजच्या काळातील शेती पूरक व्यवसाय
- शेती उत्पादनातून येणाऱ्या नफ्याचे आर्थिक नियोजन
- समुह शेती कशी करावी (SOP)
- महिलांना अनुकूल सुधारित कृषी अवजारे
- शेतीतील आधुनिकीकरण आणि तंत्रज्ञानातील नव्या वाटा
- औषधी व सुगंधी वनस्पती लागवड आणि पूरक कृषिउद्योग
- आर्थिक सबलीकरण- बचतगट/ FPO/ शेतीपुरक व्यवसाय
- आरोग्याची निगा



## ५. शेती उत्पादन-विक्री संस्थांमधील (FPOs) महिला

- शेतकरी उत्पादक कंपनी, संकल्पना, स्थापना, कायदा, अस्थापन, भांडवल उभारणी, जबाबदाऱ्या
- कंपनी नोंदणी प्रक्रिया, आवश्यक कागदपत्रे, वैधानिक प्रतिपूर्ती
- मुख्य कार्यकारी अधिकारी, आवश्यक पात्रता व जबाबदारी
- वित्तीय व्यवस्थापन व संस्थेचे आर्थिक सबलीकरण
- आंतरराष्ट्रीय व्यापार आणि त्याचे कायदे
- भारताच्या कृषी निर्यातीची सध्याची परिस्थिती, बाजारपेठेतील वस्तू आणि प्रमुख निर्यात
- भारतातून निर्यात वाढीसाठी सरकारचे धोरणात्मक उपक्रम आणि प्रमुख योजना
- APEDA, भारतीय स्पेस बोर्ड ECGS एक्सिम बँक आणि निर्यात प्रोत्साहन परिषद यांच्या कृषी निर्यात करण्यासाठी शेती उत्पादक कंपन्या (FPO)
- संभाव्य बाजारपेठ आणि कृषी उत्पादने ओळखणे

# उद्योजकता

## ६. महिला उद्योजिका

- व्यवसाय सुरु करण्यासाठी आवश्यक संसाधने
- अनुदान आणि कर सहाय्य
- उद्योजक कौशल्य आणि मार्गदर्शन
- आर्थिक सहाय्य आणि निधी पुरवठा
- मागणी आणि पुरवठा साखळी व्यवस्थापन
- आर्थिक नियोजन - कर्ज घेणे व परतफेडीची योजना तयार करणे
- बाजारपेठेचा अभ्यास आणि विश्लेषण
- शाश्वत स्पर्धात्मक व्यवसाय वृद्धीचे नियोजन
- यशस्वी उद्योजिकांशी संवाद

# सैन्यदल

## ७. सैन्यदलांत जाऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थिनी

- भारतीय सैन्यदलाचा इतिहास
- भारतीय संविधानाची तोंडओळख
- भारतीय सैन्यदलात भरती पूर्व पूर्वतयारी
- पात्रता व निवड – प्रवेश योजना महिला
- निवड केंद्रावर शिफारस केलेल्या उमेदवारांची वैद्यकीय तपासणी प्रक्रिया
- अपेक्षित शारीरिक तंदुरुस्ती व त्यासाठी तयारी
- भरती परीक्षेसाठी कोणाचे मार्गदर्शन घ्यावे
- मुल्ये आणि नैतिकता
- भारतीय सैन्यदलातील अधिकाऱ्यांबरोबर संवाद

# संशोधन

## ८. संशोधन क्षेत्रात जाऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थिनी

- संशोधन म्हणजे काय? स्वरूप आणि व्याप्ती
- संशोधन क्षेत्रातील महिलांची कामगिरी
- संशोधन संस्थामधील कामाचे स्वरूप
- मुलभूत तयारी आणि ध्येय निश्चिती
- विविध संशोधन संस्थांचा परिचय आणि संक्षिप्त माहिती
- संशोधनपर लेख (Research Paper): पूर्वतयारी
- मानसिक सक्षमतेची तयारी
- काही वैशिष्ट्यपूर्ण माहितीपट



## पत्रकारिता

### ९. महिला पत्रकार

- भारतीय पत्रकारितेचा इतिहास
- पत्रकारितेत भारतीय महिलांचे योगदान
- समस्या व आव्हाने
- महिलाविषयक कायदे
- महिला सशक्तीकरण
- यशस्वी महिला पत्रकार मुलाखत/ज्येष्ठ महिला पत्रकाराशी संवाद
- कामाच्या वातावरणात निर्माण होणाऱ्या समस्यांवर मात कशी करावी ?
- जनसंपर्क आणि सोशल मीडियाचा प्रभावी वापर
- पत्रकारितेतील मूल्ये आणि नैतिकता

## भौगोलिय तंत्रज्ञान

### १०. आपापल्या कार्यक्षेत्रात भौगोलिय (Geo-Spatial) तंत्रज्ञानाचा वापर करू इच्छिणाऱ्या सामाजिक, शासकीय आणि राजनैतिक क्षेत्रातील महिला

- भौगोलिय तंत्रज्ञान म्हणजे नेमके काय?
- ग्रामीण आणि शहरी विकासात भौगोलिय तंत्रज्ञानाचे योगदान
- पर्यावरण, जलसंधारण, शेती, मत्स्यपालन आणि भौगोलीय तंत्रज्ञान
- ग्राम मान चित्र (GPDP) निर्मितीत GIS चा उपयोग
- इस्रोने तयार केलेल्या विविध पोर्टलची प्रात्यक्षिकासह माहिती
- ड्रोन : तंत्रज्ञान आणि उपयोगिता

### प्रशिक्षण: इतर तपशील

- कालावधी : ३ दिवस
- शुल्क : प्रत्येकी रु. ३००० /-
- स्थान : रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनी, केशव सृष्टी, एस्सल वर्ल्ड रोड, उत्तन, भाईंदर (प.), ठाणे-४०११०६

### प्रशिक्षणाची वैशिष्ट्ये

- निसर्गरम्य वातावरण, अत्याधुनिक सुविधांसह प्रशस्त प्रशिक्षण संकुल
- चर्चा, सादरीकरण, प्रश्नोत्तरे, खेळ, दृक-श्राव्य माध्यमांचा वापर
- गरजाधिष्ठीत (Need Based) अभ्यासक्रम
- प्रशिक्षणार्थींसाठी प्रशिक्षणपूर्व प्रश्नावली
- प्रशिक्षणानंतर प्रशिक्षानार्थींशी ऑनलाईन संपर्क
- प्रशिक्षणार्थींचा प्रश्नावली आधारीत मूल्यमापन अहवाल

### प्रशिक्षणाचा अपेक्षित परिणाम

- आपल्या कार्यक्षेत्रात व्याप्तीविषयी स्पष्टता
- भावनिक व्यवस्थापनेच्या जाणीवेची वृद्धी
- भावनिक व्यवस्थापनामुळे व्यक्तिमत्त्व, विकासाला आणि विचारांच्या स्थिरतेत मदत
- आपल्या कामाबद्दल चौफेर विचार करण्यासाठी चालना

## संपर्क

**गीता कुलकर्णी**
प्रकल्प समन्वयक
+९१ ९८२२८ ५८०२१ | geetak@rmponweb.org

**अमेय देशपांडे**
प्रकल्प अधिकारी
+९१ ८८८८८ ०३०७३ | ameyad@rmponweb.org

# प्रबोधिनीचा प्रशिक्षण परिसर

रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनीचे ज्ञान-नैपुण्य केंद्र हे १५ एकरांचे हिरवाईने नटलेले आणि टेकड्यांच्या मधोमध वसलेले एक निसर्गसुंदर ठिकाण आहे. निवासी प्रशिक्षणाचा अविस्मरणीय अनुभव देणाऱ्या या शांत परिसरातील ग्रंथालय व इतर प्रशिक्षण सुविधा स्वयं-शिक्षणाला प्रेरणा देतात आणि मनाला अंतर्मुख करतात.

निवास | प्रशिक्षण सभागृहे | भोजन कक्ष | योग व इतर सुविधा








**मुंबई कार्यालय (नोंदणीकृत)**
१७, चंचल स्मृती, गं.द.आंबेकर मार्ग,
श्रीराम इंडस्ट्रीयल इस्टेट समोर, वडाळा,
मुंबई – ४०० ०३१, महाराष्ट्र, भारत.
दूरध्वनी : +९१ – २२ – २४१३ ६९६६ /
२४१८ ५५०२ / २४१५ ६७२५
ई मेल -rmpchanchal@rmponweb.org

**ज्ञान–नैपुण्य केंद्र (प्रशिक्षण संकुल)**
केशव सृष्टी, उत्तन, एस्सेल वर्ल्ड रोड, भाईंदर (पश्चिम)
जि. ठाणे – ४०१ १०६, महाराष्ट्र, भारत.
दूरध्वनी : +९१ – २२ – २८४५ ०१०१ / २ / ३ / ६
ई मेल -samparka@rmponweb.org

**दिल्ली कार्यालय**
१३६ नॉर्थ एव्हेन्यू, नवी दिल्ली – ११००११
दूरध्वनी : +९१ – ११ – २३०९ २०३२
ई मेल -rmpdelhi@rmponweb.org

**पुणे कार्यालय**
६२६, नारायण पेठ, लोखंडे तालीम शेजारी,
पुणे – ४११ ०३०, महाराष्ट्र, भारत.
दूरध्वनी : +९१ – २० – २४४७ ३२७१
ई मेल -cibls@rmponweb.org


rmponweb.org @rmponweb rmponweb